**<u>ठळक बातम्या</u>**

- भारताचं एलपीजी वाहक जहाज 'ग्रीन सान्वी', होर्मुझ सामुद्रधुनी पार करून मुंबईच्या दिशेने रवाना

- अमेरिकेनं दिलेल्या ४८ तासांच्या युद्धबंदीचा प्रस्ताव इराणनं फेटाळला

- पुदुच्चेरी आणि ४ राज्यातल्या विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला

**आणि**

- नाशिक जिल्ह्यात दिंडोरी इथं गाडी विहीरीत कोसळून ९ जणांचा मृत्यू/ मृतांच्या कुटुंबांना ५ लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, भारतीय जहाज 'ग्रीन सान्वी', ४४ हजार टन एलपीजी घेऊन होर्मुझ सामुद्रधुनी पार करून मुंबईच्या दिशेने रवाना झालं आहे. इराणनं होर्मुझच्या सामुद्रधुनीवर अनेक निर्बंध लादले असले तरी भारतीय ध्वज असलेल्या जहाजांना सुरक्षितपणे जाण्याची परवानगी दिली आहे. युद्ध सुरू झाल्यापासून गेल्या महिन्याभरात होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणारं हे सातवं भारतीय जहाज आहे. सामुद्रधुनीच्या पश्चिमेला अडकलेल्या १७ भारतीय जहाजांपैकी, 'ग्रीन आशा' आणि 'जग विक्रम' ही दोन जहाजं देखील एलपीजीनं भरलेली आहेत. या जहाजांना सामुद्रधुनी पार करण्याची लवकरच परवानगी मिळेल आणि एलपीजीच्या तुटवड्याचा सामना करणाऱ्या भारतीयांना मोठा दिलासा मिळेल, असं वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

पश्चिम आशियामधला संघर्ष सातत्यानं वाढत असून अमेरिकेनं दिलेल्या ४८ तासांच्या युद्धबंदीचा प्रस्ताव इराणनं फेटाळला आहे. आपल्याला हा प्रस्ताव

अमान्य असल्याचं   इराणनं हल्ला अधिक तीव्र करत दाखवून दिलं. जोपर्यंत आपल्या अटी पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत लष्करी कारवाया सुरूच ठेवण्याचा निर्धारही इराणनं व्यक्त केला आहे. तर अमेरिका आणि इस्रायलच्या सैन्यानं देखील इराणच्या हद्दीत नव्यानं हल्ले करुन दबाव कायम ठेवला आहे. इराणमध्ये महत्त्वाच्या पायाभूत सुविधा असलेल्या  भागात आणखी जीवितहानी झाल्याचं इराणनं म्हटलं आहे. इराणच्या लष्करानं गेल्या काही तासांत  अमेरिकेची एफ-15ई जेट आणि ए-10 वॉरथॉग लढाऊ विमान ही दोन लढाऊ विमानं  काल पाडली. दरम्यान दोन्ही बाजू तडजोड करण्याऐवजी आपल्या भूमिकेवर ठाम असल्याचं चित्र असून राजनैतिक चर्चांचे मार्ग सध्या तरी बंद आहेत.

**<><><><><>**

भारतीय औषधांची चालू आर्थिक वर्षात फेब्रुवारी महिन्यापर्यंत २९ अब्ज अमेरिकन डॉलरची निर्यात झाली असून गेल्या वर्षीच्या तुलनेत या निर्यातीत पाच टक्के वाढ झाली आहे. औषध निर्यात प्रोत्साहन परिषदेचे महासंचालक के राजा भानू यांनी आज हैद्राबाद इथं ही माहिती दिली. औषधनिर्माण उद्योगाची  सध्याची उलाढाल ६० अब्ज अमेरिकन डॉलर असून २०२० पर्यंत ती १३० अब्ज अमेरिकन डॉलरवर पोहोचेल असंही ते म्हणाले. जागतिक स्तरावर अनिश्चततेचं वातावरण असतानाही औषध निर्माण क्षेत्र सातत्यानं प्रगती करत असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

संसदेने मंजूर केलेल्या जन विश्वास विधेयकामुळे देशातल्या कायदेशीर प्रक्रियेत मोठे बदल होऊन व्यापार सुलभता वाढणार आहे, असा विश्वास केंद्रीय संस्कृती मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी आज व्यक्त केला. या विधेयकामुळे किरकोळ गुन्ह्यांसाठी आता कारावासाऐवजी केवळ दंड आकारला जाईल. या निर्णयामुळे न्यायालयीन प्रक्रिया अधिक वेगवान आणि तर्कसंगत होण्यास मदत

होणार आहे, असं शेखावत यांनी सामाजिक माध्यमावरील आपल्या संदेशात नमूद केलं. या महत्त्वपूर्ण पावलामुळे व्यापाऱ्यांचा आत्मविश्वास वाढेल आणि न्यायालयांवरील कामाचा बोजाही कमी होईल असंही त्यांनी नमूद केलं.

**<><><><>**

एनएचएआय म्हणजेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं महाराष्ट्रातल्या वाढवण बंदरापासून राष्ट्रीय महामार्ग ४८ वर तवा या गावापर्यंत चार-पदरी द्रुतगती महामार्गाच्या बांधकामासाठीचं कंत्राट मंजुरी पत्र जारी केलं आहे. या कामासाठी २ हजार ३६० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. दिल्ली-मुंबई द्रुतगती महामार्ग आणि एनएच-48 यांना जोडणारा हा द्रुतगती महामार्ग, वाढवण बंदराचा अंतर्गत भागाशी संपर्क वाढवेल .

**<><><><>**

‘आर्टिमिस-२ ओरियन अंतराळ यानातल्या’ चमूनं चंद्राकडे जायच्या प्रवासात पृथ्वीची घेतलेली छायाचित्रं नासानं प्रसिद्ध केली आहेत. या मोहिमेचे कमांडर रीड वाईजमन यांनी कॅप्सूलच्या खिडकीतून ही छायाचित्रं टिपली आहेत. सर्वात प्रथम सादर झालेल्या या छायाचित्रांना ‘हॅलो वर्ल्ड’ असं नाव देण्यात आलं आहे. या चित्रांमध्ये पृथ्वी ढगांनी आच्छादलेली दिसत असून अटलांटिक महासागराचा अथांग निळा विस्तार आणि दोन्ही ध्रुवांवरचे हिरवे अरोरा दिसत आहेत.

**<><><><>**

पुद्दुचेरीसह केरळ, पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि आसाम या चार राज्यांमधल्या आगामी विधानसभा निवडणुकांच्या प्रचाराला वेग आला असून विविध राजकीय पक्षांचे प्रमुख नेते जाहीरसभा, रॅली आणि रोडशोच्या माध्यमातून प्रचार करत आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज तामिळनाडूमध्ये चेन्नई इथं प्रचारसभा घेत असून त्यांनी आज प्रसिद्ध संगीतकार रमेश विनायकम

यांची भेट घेतली. त्यानंतर प्रधानमंत्री केरळमध्ये तिरुवल्ला इथं सभा घेणार आहेत आणि तिरुवनंतपुरम इथं रोडशोमध्ये सहभागी होणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज आसाममध्ये प्रचारसभा घेतली. तर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज अलाप्पुझा इथं  जाहीरसभा घेतली.

दरम्यान निवडणूक आयोगानं पश्चिम बंगालमधल्या आगामी विधानसभा निवडणुकीसाठी ४ हजार ६६०हून अधिक सहायक मतदान केंद्र उभारायला मंजुरी दिली आहे. ज्या मंतदारसंघांमध्ये मतदारांची संख्या बाराशे पेक्षा अधिक आहे, अशा ठिकाणी सहायक मतदार संघ स्थापन केले जाणार आहेत. सर्व राजकीय पक्षांना आदर्श आचारसंहितेचं पालन करणं बंधनकारक असून प्रत्यक्ष किंवा डिजिटल स्वरूपात देखील आचारसंहितेचं उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, असं केरळच्या निवडणूक आयोगानं पुन्हा एकदा स्पष्ट केलं आहे.

तर पश्चिम बंगालमध्ये मतदारांना आणि विरोधकांना धमकावल्याच्या आरोपाखाली,  तृणमूल काँग्रेसचे  नेते हाफिजुल मोल्ला प्रधान यांना अटक करण्यात आली आहे.

आसाम, केरळ आणि पुद्दुचेरी मध्ये येत्या ९ एप्रिलला, तामिळनाडूमध्ये २३ एप्रिलला तर पश्चिम बंगालमध्ये २३ आणि २९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. पश्चिम बंगाल मधल्या पहिल्या टप्प्याच्या मतदानासाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ९ एप्रिल तर दुसऱ्या टप्प्यासाठी १३ एप्रिल अशी  असून तामिळनाडू मध्ये ९ एप्रिल पर्यंत उमेदवार आपले अर्ज मागे घेऊ शकतील.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी इथं कार विहिरीत कोसळल्यानं एकाच कुटुंबातल्या ९ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये ६ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. एका

खासगी शिकवणी वर्गाचं स्नेहसंमेलन आटोपून हे सर्वजण निघालेले असताना मंगल कार्यालयाजवळच्या शेतातल्या विहिरीत त्यांची कार कोसळली.

आपत्कालीन व्यवस्थापन  मंत्री गिरीश महाजन तसंच अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी आज घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबांना ५ लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर केलं आहे. तसंच जिल्हाप्रशासनाला दुर्घटनेची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दोन सामने होत आहेत. पहिला सामना दुपारी साडेतीन वाजता दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियममध्ये दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध मुंबई इंडियन्स यांच्यात होणार आहे.

**<><><><><>**

देशाच्या हिमालयीन क्षेत्रात हिमवृष्टी होत असून त्याचा वाहतूक आणि जनजीवनावर परिणाम झाला आहे.

जम्मूकाश्मीर मधे बांदिपोरा - गुरेज रस्त्यावर बर्फ साचल्यानं ३८ वाहनं अडकून पडली होती.सीमा रस्ते निर्माण संघटनेनं त्यांची सुटका केली.

हिमाचल प्रदेशातही उंचावरच्या भागात हिमवृष्टी होत असून पुढचा आठवडाभर पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यांचा इशारा हवामानविभागाने दिला आहे.

**<><><><><>**

जम्मू-कश्मीर, लडाख आणि केरळ मध्ये आज मुसळधार पाऊस पडेल, असा अंदाज  हवामान खात्यानं वर्तवला आहे. उत्तर प्रदेश सह उत्तर भारतातली अनेक राज्यं, पूर्व मध्यप्रदेश आणि छत्तीसगडमध्ये मेघगर्जनेसह गारपीट होईल, असा इशारा हवामानखात्यानं दिला आहे.

**//<><><><><>//**